**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी : (०२०) २५५३ ७६८८.**
**वेबसाईट : www.mcaer.org** **फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.**

<u>जलद टपालाने</u>

जा.क्र. मकृप/शिक्षण/९१६/१०८० दि. ९ मे,२०१६

## <u>प रि प त्र क</u>

**विषयः- कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांकडून प्रत्येकी रू.२०.०० लाख अनामत रक्कम टप्प्याटप्प्याने कृषी परिषद कार्यालयाकडे जमा करण्याबाबत.**

संदर्भः- या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/प्र.क्र.९१६/५६८, दि.१८/३/२०१६

कृषी परिषद कार्यालयाच्या संदर्भ क्र. १ येथील परिपत्रकान्वये सध्या अस्तित्वात असलेल्या १५६ कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांना रू.२०.०० लाख अनामत रकमेची बाब लागू करण्यात आली आहे. यापूर्वी विना अनुदानित महाविद्यालयांकडून संबंधित कृषी विद्यापीठांकडे किंवा कृषी परिषदेकडे जमा असलेली अनामत रक्कम वगळता उर्वरित रक्कम सर्व विना अनुदानित महाविद्यालयांनी दि. ५/५/२०१६ पर्यंत कृषी परिषद कार्यालयाकडे जमा करण्याचे सूचित करण्यात आलेले आहे. या मुदतीत रक्कम प्राप्त न झाल्यास संबंधित महाविद्यालयाचे नाव प्रवेश प्रक्रियेतून वगळण्यात येईल, असेही नमूद करण्यात आले आहे.

या अनुषंगाने काही कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांकडून कृषी परिषदेकडे सदरची रक्कम जमा करण्यात आलेली आहे. तर काही महाविद्यालयांकडून सदर रक्कम भरण्यास मुदत देण्याविषयी विनंती केलेली आहे.

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश देण्याची पदवी प्रवेश प्रक्रिया दि. २ मे,२०१६ पासून सुरु झाली आहे. तर पहिल्या वर्षात प्रवेश देण्याची प्रवेश प्रक्रिया दि. ५ जून,२०१६ पासून सुरु होणार आहे. अशा परिस्थितीत विविध महाविद्यालयांकडून मुदत देण्याविषयीची विनंती विचारात घेता, रू.२०.०० लाख अनामत रक्कम एकरकमी कृषी परिषदेकडे न भरता टप्प्याटप्प्याने भरण्याची सवलत विना अनुदानित महाविद्यालयांना देण्यात येत आहे.

याप्रमाणे मे, २०१६ अखेर पहिला हप्ता, सप्टेंबर, २०१६ अखेर दुसरा हप्ता आणि डिसेंबर, २०१६ अखेर तिसरा हप्ता अशी रू.५.०० लाख प्रती हप्ता याप्रमाणे एकूण रू. १५.०० लाख रक्कम विना अनुदानित महाविद्यालयांनी कृषी परिषदेकडे जमा करावी. ज्या महाविद्यालयांकडून रू.१५.०० लाखापेक्षा जास्त रक्कम जमा होणे आहे, त्या महाविद्यालयांनी तिसरा हप्ता जादाच्या रकमेसह जमा

करावा. याचबरोबर या परिपत्रकाद्वारे असेही सूचित करण्यात येते की, पहिला हप्ता मे,२०१६ पर्यंत जमा न झाल्यास अशा महाविद्यालयांची सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया कोणतीही पूर्वसूचना न देता स्थगित करण्यात येईल, याची कृपया सर्व विना अनुदानित महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**

**महासंचालक**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**पुणे**

प्रति,

१. कुलसचिव / नियंत्रक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर
२. कुलसचिव / नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
३. कुलसचिव / नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
४. कुलसचिव / नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
सर्व कृषी विद्यापीठांना सूचित करण्यात येते की, विना अनुदानित पदवी महाविद्यालयांची त्यांच्याकडे जमा असलेली अनामत रक्कम दि. १५ मे,२०१६ पर्यंत कृषी परिषद कार्यालयाकडे जमा करण्याची कार्यवाही करावी.
५. प्राचार्य, सर्व कृषी विद्यापीठांतर्गत कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावरील सर्व महाविद्यालये.

प्रतः-

१. मा. मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे विशेष कार्य अधिकारी, मा.मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. उपाध्यक्ष यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
३. वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
४. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
५. निवड नस्ती.